आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

११ जानेवारी २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार

- गेल्या वर्षभरात १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात यश आलं असून, स्वातंत्र्यानंतरची ही सर्वात मोठी कामगिरी, असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- येत्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी महाराष्ट्रातल्या एकूण २३ जणांना विशेष अतिथी म्हणून आमंत्रण

**आणि**

- अमेरिकेत कॅलिफोर्निया इथं लागलेल्या वणव्यात आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राष्ट्रीय युवा दिनानिमित्त दिल्लीत भारत मंडपम् इथं तीन हजार युवा नेत्यांशी संवाद साधणार आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. विकसित भारतासाठी एक लाख तरुणांना राजकारणात सहभागी करून त्यांना राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून देणं हा या संवादाचा उद्देश आहे. यावेळी तंत्रज्ञान, शाश्वतता, महिला सक्षमीकरण, उत्पादन आणि शेती यासारख्या विषयांवर दहा उत्कृष्ट निबंधांच्या पुस्तकाचं प्रकाशन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

२०२४ मध्ये १६ हजार ९१४ कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात पोलीस आणि एनसीबीला यश मिळालं आहे. स्वातंत्र्यानंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे. असं ते यावेळी म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज ही माहिती दिली. स्वातंत्र्यानंतरची ही सर्वाधिक आकडेवारी आहे असं ते म्हणाले….

**होल्ड बाईट….**

शहा आज दिल्लीत अंमली पदार्थ तस्करी आणि राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर आयोजित परिषदेला संबोधित करत होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील विकसित भारताचं निर्माण करायचं असेल तर नशामुक्त भारताच्या सिद्धीशिवाय ते शक्य नाही. यासाठी केंद्र आणि राज्यांनी एका व्यासपीठावर येऊन काम करायला हवं, असं
आवाहन शहा यांनी यावेळी केलं.

या परिषदेदरम्यान, अमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा मोहिमेचा शुभारंभ अमित शहा यांच्या हस्ते झाला. येत्या २५ तारखेपर्यंत सुरू राहणाऱ्या अमली पदार्थ विल्हेवाट लावण्याच्या पंधरवडा मोहिमेदरम्यान ८ हजार ६०० कोटी रुपये मूल्याच्या सुमारे एक लाख किलो अमली पदार्थांची विल्हेवाट लावली जाणार आहे. यामुळे एक ठोस संदेश जनतेपर्यंत जाईल, अशी मला खात्री आहे, असंही शहा यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज अयोध्येतल्या रामलल्ला अभिषेकाच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हे मंदिर शतकानुशतके बलिदान, तपश्चर्या आणि संघर्षानंतर बांधलं गेलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमांवर म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी याला आपल्या

संस्कृतीचा आणि अध्यात्माचा महान वारसा, असंही म्हटलं आहे. विकसित भारताचा संकल्प पूर्ण करण्यासाठी हे दिव्य आणि भव्य राम मंदिर प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. अयोध्येत रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून तीन दिवसांचा विशेष कार्यक्रम सुरू होत आहे. गेल्या वर्षी २२ जानेवारी रोजी प्राणप्रतिष्ठा झाली होती, परंतु तिथीनुसार आजपासून हा उत्सव साजरा केला जाणार आहे. यावेळी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते रामलल्लांचा अभिषेक होणार आहे.

**<><><><><>**

प्रयागराजमध्ये होणाऱ्या महाकुंभ २०२५ साठी अवघे दोन दिवस उरले असताना, यात्रेकरू आणि पर्यटकांसाठी वाहतुकीच्या विविध माध्यमांतून शहरात पोहोचण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. भारतीय रेल्वेने लाखो भाविकांसाठी प्रयागराजला जाणारा सुरक्षित आणि तीन हजार ३०० विशेष गाड्यांसह १० हजारांहून अधिक गाड्या या मार्गावर चालवल्या जात आहेत. अनारक्षित प्रवाशांसाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उत्तर प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळानं सात हजार बसेस तैनात केल्या आहेत, ज्यात ३५० शटल बसेस विशेषत: जत्रा परिसरात देखरेख करण्यासाठी तैनात केल्या आहेत. विमान कंपन्यांनी नवीन उड्डाणं जोडल्यामुळे, प्रयागराजला महाकुंभ दरम्यान २५ प्रमुख शहरांशी थेट हवाई संपर्क असेल.

**<><><><><>**

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी मुंबईतल्या ५ आणि महाराष्ट्रातल्या एकूण २३ व्यक्तींना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये मुंबईतल्या अतुल जाधव, वैभव पाटील, ब्रह्मदेव पंडित, अभय ब्रह्मदेव पंडित

उज्ज्वला पाटील यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यावर्षी २६ जानेवारी रोजी नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या संचलनाला विविध क्षेत्रात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या १० हजार व्यक्तींना विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत, लॉस एंजेलिस काउंटीजवळ लागलेल्या वणव्यामध्ये आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार १३ हजारांहून जास्त इमारती या आगीत नष्ट झाल्या असून जवळपास १ लाखाहून अधिक रहिवाशांना स्थलांतराचे आदेश देण्यात आले आहेत. सध्या या प्रदेशात चार मोठे वणवे लागले आहेत. सांता मोनिका आणि मालिबू दरम्यान सर्वात मोठी आग लागली असून कालपर्यंत ही आग आठ टक्के आटोक्यात आली आहे. तर अल्टाडेना आणि पासाडिना जवळ लागलेली आग ३ टक्के आटोक्यात आली आहे. दरम्यान, पाणी व्यवस्थापनाशी संबंधित तक्रारीची चौकशी करण्याचे आदेश कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरनं दिले आहेत. लॉस एंजेलिसमध्ये लागलेला वणवा अनेक महिने सुरू राहण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

भारतीय वंशाची अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी निक हेग एनआयसीआर दुर्बिणीच्या दुरुस्तीसाठी अंतराळ स्थानकातून बाहेर पडून वावरणार आहेत. न्यूट्रॉन ताऱ्यांच्या अंतर्भागाचं निरीक्षण करण्यासाठी बनवलेल्या या दुर्बिणीच्या संरक्षक कवचातून सूर्यप्रकाश  झिरपल्यामुळे नोंदींमधे बिघाड झाल्याचं दिसून येत आहे. त्याची दुरुस्ती हे दोघे येत्या १६ जानेवारीला करणार आहेत. दरम्यान अंतराळात अडकलेले सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे अमेरिकन

अंतराळवीर येत्या मार्चपर्यंत तरी पृथ्वीवर परतणार नाहीत, असं नासानं जाहीर केलं आहे.

<><><><>

सिंगापूरचे राष्ट्राध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम १४ ते १८ जानेवारी दरम्यान भारत भेटीवर येत आहेत. सिंगापूर राष्ट्राध्यक्षाची गेल्या दहा वर्षातली ही पहिली भारत भेट असून भारत आणि सिंगापूर यांच्यातल्या राजनैतिक संबंधांना साठ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त ही भेट आहे. आपल्या दौऱ्यात षण्मुगरत्नम नवी दिल्ली आणि ओदिशाला भेट देतील. तसंच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील.

<><><><>

खोखो विश्वचषक स्पर्धेची सुरुवात येत्या सोमवार पासून नवी दिल्ली इथल्या इंदिरा गांधी इनडोअर स्टेडीअम मध्ये होणार आहे. २० पुरुष आणि १९ महिला संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. आतापर्यंत १४ संघांचं आगमन झाल्याचं आयोजकांनी सांगितलं आहे. युरोप, दिक्षिण अफ्रिका, दक्षिण अमेरिकेमधले संघ या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. स्पर्धेची पूर्ण तयारी झाल्याचंही आयोजकांनी सांगितलं. १९ जानेवारी पर्यंत या स्पर्धा चालणार आहेत.

<><><><>

१४ जानेवारी हा दिवस देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांमधून निवृत्त झालेल्या जवानांचा दिवस म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने मुंबईत मरीन ड्राइव्ह इथं ५०० निवृत्त जवानांचं संचलन उद्या होणार आहे. यात शौर्यपदक विजेते जवानही सहभागी होतील. देशाच्या सेवेसाठी निवृत्त जवानांचं योगदान अधोरेखित करणं हा या संचलनाचा उद्देश आहे.

**<><><><><>**

चित्रपटसृष्टीत लेखकांना योग्य तो मान आणि मोबदला मिळणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन प्रसिद्ध पटकथा लेखक आणि गीतकार पद्मभूषण जावेद अख्तर यांनी केलं आहे. २१व्या थर्ड आय आशियाई चित्रपट महोत्सवाच्या काल झालेल्या उद्घाटन सोहळ्यादरम्यान त्यांना 'एशियन कल्चर' या विशेष पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

आसाममधे दिमा हासो जिल्ह्यातल्या उम्रांग्सो कोळसा खाणींमधे पुराचं पाणी शिरल्यानं मृत्युमुखी पडलेल्या आणखी एका खाणकामगाराचा मृतदेह आज मदतपथकाने बाहेर काढला.

**<><><><><>**

लडाखमध्ये, तापमानात घट झाली असून द्रास मध्ये उणे २४ पूर्णांक ८ अंश सेल्सिअस आणि कारगिलमध्ये उणे १४ पूर्णांक ६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. झोजिलामध्ये सर्वात कमी उणे ३१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. कारगिल- श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरची वाहतूक सोमवार पर्यंत बंद राहणार आहे.

**जम्मू काश्मीर** मध्ये आजही थंडीची लाट कायम असून येत्या २४ तासांत पाऊस आणि बर्फवृष्टीची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. जम्मू काश्मीरमधे आज ढगाळ हवामान रहाणार असून येत्या २४ तासांत जम्मूमध्ये हलका पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**हिमाचल** प्रदेशाच्या डोंगराळ भागात आज दाट धुकं पसरलं आहे. धुक्यामुळे जनजीवनावर परिणाम झाला असून वाहतूक मंदावली आहे. डोंगराळ भागात आज आणि उद्या पाऊस तसंच बर्फवृष्टीची शक्यता असून दाट धुक्यासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

**राजस्थानात** अनेक जिल्ह्यांमध्ये आज सकाळपासून पाऊस पडत असून थंडीचा कडाका वाढला आहे.

**//<><><><><>//**